## ६. भजूया भजूया सारे

भजूया भजूया सारे मेहेर प्रभूला ॥धृ.॥
ब्रह्मांडि अवघा भरला, भक्तांसाठी जो अवतरला ॥

धर्म लया गेला गेला, सत्य लोप झाला झाला ।
वचनी वैकुंठीचा राणा, गुंतला म्हणोनी आला ॥१॥

धुंद झाले सारे जन, गेले देवा विसरून ।
द्याया त्याची आठवण, मोह नाश करण्या आला ॥२॥

उठा उठा सोडा आळस, उभा ठाकला सर्वेश ।
अमृताचा घेऊनि कलश, अमरपदी नेण्या आला ॥३॥

ओळखा प्रभूला आतां, आळवा तयाला आतां ।
मधुसूदना हा त्राता, जागविण्या जगतां आला ॥४॥

Scanned by CamScanner